**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**महापालिका सचिव कार्यालय**
**दि. १०/०८/२०२६**

**मा. महासभा दि. १३/०८/२०२६**
**पुरक घोषणा**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीम.** -------------------------------------------

**नगरसेवक/नगरसेविका**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १३/०८/२०२६ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ७५ | सन्मा. सदस्या नीला सोन्स यांचा दिनांक ०६/०८/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>--------------------------------------------------------------------<br>बी.ओ.टी. तत्त्वावर बांधलेल्या मार्केट पुन्हा बी.ओ.टी. तत्त्वावर देण्यात आलेले निविदा रद्द करण्याबाबत. |
| ७६ | सन्मा. सदस्या नीला सोन्स यांचा दिनांक ०६/०८/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>--------------------------------------------------------------------<br>विकासकांना (बिल्डर्सना) पुनर्विकासाच्या माध्यमातून लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या स्ट्रक्चरल ऑडिट विभागामार्फत धोकादायक नसलेल्या इमारतींनाही संशयास्पद पद्धतीने धोकादायक घोषित करून नोटिसा बजावणे, रहिवाशांवर घरे खाली करण्यासाठी दबाव निर्माण करणे, संभाव्य भ्रष्टाचार व संगनमतास प्रतिबंध करण्यासाठी निष्पक्ष चौकशी समिती गठित करणे, पुनर्निरीक्षण, अंतरिम स्थगिती तसेच थर्ड पार्टी स्ट्रक्चरल ऑडिट व्यवस्था लागू करण्याबाबत. |
| ७७ | सन्मा. सदस्या नीला सोन्स यांचा दिनांक ०६/०८/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>--------------------------------------------------------------------<br>महासभेचे थेट प्रक्षेपण (Live प्रसारण) सुरू करण्याबाबत. |

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# नीला सोन्स

नगरसेविका - मिरा भाईदर महानगरपालिका
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)
वृक्ष प्राधिकरण समिती सदस्या

मिरा भाईदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०११०१.

संपर्क : निओ ग्रुप, सेवन इलेवन रेसिडेन्सी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०११०७
मोबाइल : 9892718100 ● ई-मेल : neelasoans100@gmail.com


जावक क्र. ________ प्रकरण क्र. ७५ करिता दिनांक 06/08/2026

प्रति,
मा. सचिव महोदय,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग पुरक घोषणा
स.प./न.प./ज.प./का.प./म.अ.
आवक क ...८... दि:०६/०८/२०२६

**विषय : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची “ड” प्रकरण २ नियम १(ज) अन्वये मा. महासभा दिनांक १३/०८/२०२६ मध्ये बी.ओ.टी. तत्त्वावर बांधलेल्या मार्केट पुन्हा बी.ओ.टी. तत्त्वावर देण्यात आलेले निविदा रद्द करण्याबाबत “ज” चा प्रस्ताव घेणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रस्ताव मा. महासभा दिनांक १३/०८/२०२६ मध्ये घेण्यात यावा.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील बी.ओ.टी. तत्त्वावर बांधण्यात आलेली मार्केट्स सन २०१८ मध्ये विकसित करण्यात आली होती:

1. आरक्षण क्र. २३० मधील मार्केट
2. आशा नगर, भाईंदर (पूर्व)
3. मंगल मार्केट नं. १, हटकेश उद्योग

संबंधित करार व निविदेच्या अटींनुसार करार कालावधी समाप्त झाल्यानंतर सदर मार्केट्स महानगरपालिकेची मालमत्ता म्हणून हस्तांतरित होणे अपेक्षित होते. परंतु, सदर मालमत्ता पुन्हा बी.ओ.टी. तत्त्वावर प्रशासन कालावधीत निविदा प्रक्रिया करून ठेकेदाराला देण्यात आलेली आहे.

सदर प्रक्रियेमध्ये भ्रष्टाचार दिसून येत असून फेरीवाल्यांमध्ये शंका व असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे या प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच, नवीन निविदेनुसार फेरीवाल्यांकडून आकारण्यात येणारे शुल्क ₹८५ वरून ₹२३० पर्यंत वाढविण्यात आले असून, यामुळे फेरीवाल्यांवर अन्यायकारक आर्थिक भार पडत आहे व त्यांच्या उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

# नीला सोन्स
नगरसेविका - मिरा भाईदर महानगरपालिका
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)
वृक्ष प्राधिकरण समिती सदस्या

मिरा भाईदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०११०१.

संपर्क : निओ ग्रुप, सेवन इलेवन रेसिडेन्सी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०११०७
मोबाइल : 9892718100 ● ई-मेल : neelasoans100@gmail.com


जावक क्र. ________ दिनांक 06/08/2026

यामुळे सदर निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता, पारदर्शकतेचा अभाव तसेच फेरीवाल्यांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी, उपरोक्त बाबींचा विचार करून सदर बी.ओ.टी. तत्त्वावर काढण्यात आलेली निविदा रद्द करण्यात यावी या करिता दि. १३/०८/२०२६ रोजीच्या मा. महासभेत महानगरपालिका अधिनियामाप्रमाणे “ज” चा प्रस्ताव सादर करीत आहेत .

धन्यवाद.
आपली विश्वासू,

Neelasoans

**नीला सोन्स**
नगरसेविका, प्रभाग क्र. १८
मिरा-भाईदर महानगरपालिका

नीला सोन्स
नगरसेविका - मिरा भाईंदर महानगरपालिका
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)
वृक्ष प्राधिकरण समिती सदस्या

मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०११०१.

संपर्क : निओ ग्रुप, सेवन इलेवन रेसिडेन्सी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०११०७
मोबाइल : 9892718100 ● ई-मेल : neelasoans100@gmail.com


जावक क्र. ____________ प्रकरण क्र. ७६ करिता दिनांक 06/08/2026

प्रति,
मा. सचिव महोदय,
मिरा भाईंदर महानगरपालिका,

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग पुरक घोषणा
~~स.प./त्र.प./ज.प./क्रा.प./अ.आ.~~
आवक क ..६..... दि:०६/०८/२०२६

विषय: विकासकांना (बिल्डर्सना) पुनर्विकासाच्या माध्यमातून लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या स्ट्रक्चरल ऑडिट विभागामार्फत धोकादायक नसलेल्या इमारतींनाही संशयास्पद पद्धतीने धोकादायक घोषित करून नोटिसा बजावणे, रहिवाशांवर घरे खाली करण्यासाठी दबाव निर्माण करणे, संभाव्य भ्रष्टाचार व संगनमतास प्रतिबंध करण्यासाठी निष्पक्ष चौकशी समिती गठित करणे, पुनर्निरीक्षण, अंतरिम स्थगिती तसेच थर्ड पार्टी स्ट्रक्चरल ऑडिट व्यवस्था लागू करण्याबाबत महासभा प्रस्ताव

संदर्भ: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 अंतर्गत 'ज' प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विनम्र निवेदन असे की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नवीन यूडीसीपीआर-2020 लागू झाल्यानंतर पुनर्विकास प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात गती प्राप्त झाली आहे. या पार्श्वभूमीवर विविध गृहनिर्माण संस्थांमधील (सोसायट्यांतील) रहिवाशांकडून गंभीर तक्रारी व शंका व्यक्त करण्यात येत आहेत की, काही प्रकरणांमध्ये विकासकांना (बिल्डर्सना) लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने विभागामार्फत वास्तव्यास योग्य व सुस्थितीत असलेल्या इमारतींनाही धोकादायक घोषित करून नोटिसा बजावण्यात येत आहेत. परिणामी, पुनर्विकास स्वीकारण्यासाठी रहिवाशांवर अप्रत्यक्ष दबाव निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

# नीला सोन्स

नगरसेविका - मिरा भाईंदर महानगरपालिका
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)
वृक्ष प्राधिकरण समिती सदस्या

मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०११०१.

संपर्क : निओ ग्रुप, सेवन इलेवन रेसिडेन्सी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०११०७
मोबाइल : 9892718100 ● ई-मेल : neelasoans100@gmail.com

जावक क्र. ______________                                                    दिनांक 06/08/2026

तसेच, स्ट्रक्चरल ऑडिट प्रक्रियेमध्ये पारदर्शकतेचा अभाव व संभाव्य भ्रष्टाचाराबाबत नागरिकांमध्ये गंभीर शंका निर्माण झालेल्या असल्यामुळे अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी व निष्पक्ष चौकशी सुनिश्चित करण्यासाठी स्वतंत्र समिती गठित करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

सदर विषय हा जनहित, नागरिकांची सुरक्षितता व प्रशासनातील पारदर्शकतेशी संबंधित असल्यामुळे यासंदर्भातील सविस्तर विषय पत्रक महासभेत चर्चा व विचारार्थ सादर करण्यासाठी संलग.

धन्यवाद.

आपली विश्वासू,

Neelsoans

नीला सोन्स
नगरसेविका, प्रभाग क्र. १८
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# नीला सोन्स

नगरसेविका - मिरा भाईंदर महानगरपालिका
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)
वृक्ष प्राधिकरण समिती सदस्या

मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०११०१.

संपर्क : निओ ग्रुप, सेवन इलेवन रेसिडेन्सी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०११०७
मोबाइल : 9892718100 ● ई-मेल : neelasoans100@gmail.com


जावक क्र. ____________ प्रकरण क्र. ७७ करिता दिनांक 06/08/2026

प्रति,
मा. सचिव सो.,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग पुरक घोषणा
स.प./न.प./ज.प./का.प./मा.अ.
आवक क्र ९० ... दि ०६/०८/२०२६

विषय : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची “ड” प्रकरण २ नियम १(ज) अन्वये मा. महासभा दिनांक १३/०८/२०२६ मध्ये महासभेचे थेट प्रक्षेपण (Live प्रसारण) सुरू करण्याबाबत “ज” चा प्रस्ताव घेणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रस्ताव मा. महासभा दिनांक १३/०८/२०२६ मध्ये घेण्यात यावा.

एक जनप्रतिनिधी म्हणून महासभा ही केवळ निवडून आलेल्या सदस्यांची बैठक नसून ती सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी कार्य करणारे सर्वोच्च व्यासपीठ आहे. नागरिकांनी निवडून दिलेले जनप्रतिनिधी महासभेत कोणते विषय मांडत आहेत, शहर विकासासंदर्भात कोणत्या मुद्द्यांवर चर्चा करीत आहेत तसेच कोणते निर्णय घेतले जात आहेत, याची माहिती नागरिकांपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचणे आवश्यक आहे. ही माहिती जाणून घेणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाही व्यवस्थेतील मूलभूत अधिकार आहे.

प्रशासकीय पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित करणे ही सर्व जनप्रतिनिधींची सामूहिक जबाबदारी आहे. त्याच भावनेतून महानगरपालिकेचे कामकाज नागरिकांसमोर अधिक पारदर्शकतेने सादर करण्यात यावे, ही अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

भारतीय जनता पार्टी ही पारदर्शक व जवाबदेही शासन व्यवस्थेसाठी ओळखली जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे देशातील आर्थिकदृष्ट्या सर्वात मोठी महानगरपालिका असलेल्या मुंबई महानगरपालिकेमध्ये महासभेचे थेट प्रक्षेपण नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

नीला सोन्स
नगरसेविका - मिरा भाईंदर महानगरपालिका
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)
वृक्ष प्राधिकरण समिती सदस्या

मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०११०१.

संपर्क : निओ ग्रुप, सेवन इलेवन रेसिडेन्सी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०११०७
मोबाइल : 9892718100 ● ई-मेल : neelasoans100@gmail.com

जावक क्र. ______________ दिनांक 06/08/2026

त्यामुळे नागरिक घरबसल्या महासभेचे कामकाज पाहू शकतात व लोकशाही प्रक्रियेवरील त्यांचा विश्वास अधिक दृढ होत आहे.

महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिका महासभांचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) सुरू आहे, त्यामुळे प्रशासनातील पारदर्शकता, नागरिकांचा सहभाग व लोकप्रतिनिधींच्या कामकाजाबाबत जनजागृती वाढण्यास मदत होत आहे."

मिरा-भाईंदर महानगरपालिका तांत्रिकदृष्ट्या सक्षम असून महानगरपालिकेचे विविध कार्यक्रम, महिला दिन, रौप्य महोत्सव आदी उपक्रमांचे थेट प्रक्षेपण नियमितपणे सुरू आहे. त्या अनुषंगाने, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) देखील पुढील महासभेपूर्वी सुरू करण्यात यावे.

एक जनप्रतिनिधी व नगरसेविका म्हणून माझी स्पष्ट अपेक्षा आहे की महानगरपालिकेच्या महासभेचे कामकाज अधिकाधिक पारदर्शक पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात यावे. महासभेत घेतले जाणारे निर्णय हे थेट नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी, शहराच्या विकासाशी व सार्वजनिक सुविधांशी संबंधित असतात. त्यामुळे महासभेतील चर्चा, मांडण्यात आलेले विषय, निर्णय प्रक्रिया व विकाससंदर्भातील बाबी नागरिकांपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचण्यासाठी महासभेचे थेट प्रक्षेपण (Live प्रसारण) करण्यात यावे, ही अत्यंत आवश्यक बाब आहे.

तरी, उपरोक्त बाबींचा विचार करून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) सुरु करण्याबाबत दि. १३/०८/२०२६ रोजीच्या मा. महासभेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार 'ज' चा प्रस्ताव सादर करीत आहोत.
धन्यवाद.
आपली विश्वासू,

Neelsoans

**नीला सोन्स**
नगरसेविका, प्रभाग क्र. १८
मिरा-भाईंदर महानगरपालिका